ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि मूल्यशिक्षण

*** प्रा. डॉ. धनराज हाडुळे,**

* तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र विभाग, अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

**सारांश :**

*शैक्षणिक सत्र 2022-23 पासून 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020' ची अंमलबजावनी सुरू करण्यात आलेली आहे. या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय व उच्च शिक्षणाच्या रचनेत आमूलाग्र बदल करण्यात आलेले आहेत. शिक्षण अभ्यासक्रमांना वेगवेगळ्या शाखांच्या चौकटीतून बाहेर काढून आंतरशाखीय आणि समन्वयी करण्यात आले आहे. शिक्षणाचा उद्देश चांगला, अष्टपैलू व कल्पक व्यक्ती निर्माण करणे हे असणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित केला जाणार असून, 21 व्या शतकासाठी आवश्यक असलेली कौशल्ये प्रदान करण्याला महत्त्व देण्यात आले आहे. वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी देशभर वाचनालयाचा विस्तार केला जाणार असून, डिजीटल वाचनालये स्थापन केली जाणार आहेत. उच्च शिक्षणात महत्त्वपूर्ण बदल करून संशोधनाला चालना देण्यासाठी 'नॅशनल रिसर्च फाऊंडेशनची' स्थापना केलेली आहे. तसेच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये प्रभावी अभ्यासक्रम, बहुभाषिक शिक्षण, शिक्षकाची गुणवत्ता, ऑनलाईन शिक्षण इत्यादी गोष्टींकडे लक्ष देण्यात आलेले आहे. त्याचबरोबर या धोरणामध्ये मूल्यशिक्षणालाही महत्त्व दिलेले आहे. प्रत्येकाला शिक्षण घेता यावे, या उद्देशाने देशात "अकॅडमिक बॅंक ऑफ क्रेडिट" ही योजना राबविली जाणार आहे. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार व उपलब्ध वेळेनुसार शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होईल.*

**कीवर्ड** : *नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, मूल्यशिक्षण, बहुशाखीय अभ्यासक्रम, शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, अकॅडमिक बॅंक ऑफ क्रेडिट, संशोधन पध्दत, बहुभाषिक शिक्षण.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना :**

भारताने 1986 नंतर पहिल्यांदाच शैक्षणिक धोरणात बदल करून तब्बल 34 वर्षानंतर 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020' जाहीर केले. इस्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या धोरणाचा मसुदा तयार केला. विद्यमान मंत्रीमंडळाने भारतीय शिक्षण पध्दतीत अनेक बद्दल घडवून आणण्याच्या उद्देशाने 29 जुलै 2020 रोजी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मान्यता दिली. या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत अनेक सुधारणा व आमूलाग्र बदल करण्यात आलेले आहेत. या लेखामध्ये सर्वप्रथम नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची माहिती, शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षण या दोन भागामध्ये दिलेली आहे. तसेच या शैक्षणिक धोरणातील मूल्यशिक्षणाचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020:**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत शालेय व उच्च शिक्षणाच्या रचनेत आमूलाग्र बदल करण्यात आलेले आहेत. शिक्षण अभ्यासक्रमांना वेगवेगळ्या शाखांच्या चौकटीतून बाहेर काढून आंतरशाखीय आणि समन्वयी करण्यात आले आहे. म्हणजेच एकाचवेळी अभियांत्रिकी व संगीत हे दोन्ही विषय घेऊन उच्च शिक्षण पूर्ण करता येईल. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित केला जाणार असून, 21 व्या शतकासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करण्याला महत्त्व देण्यात आले आहे. या धोरणातील तरतुदीनुसार 3 ते 14 वर्ष वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहेत. यापूर्वी हा वयोगट 6 ते 14 वर्षे होता. बालकाच्या वयाच्या 4 थ्या वर्षी नर्सरीपासून शिक्षणाला सुरवात होणार आहे आणि वयाच्या 7 व्या वर्षी तो इयत्ता पहिलीमध्ये असणार आहे.

➢ **शालेय शिक्षण :**

**शालेय शिक्षणाची रचना**:

शालेय शिक्षणाच्या सध्याच्या 10 + 2 या संरचनेत बदल करून 3 ते 18 वयोगटाला समाविष्ट करणारी 5 + 3 + 3 + 4
अशी नवीन अध्यापनशास्त्राची आणि अभ्यासक्रमाची रचना तयार केलेली आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शालेय शिक्षणाची नवीन शैक्षणिक धोरणानुसार शालेय शिक्षणाची रचना पुढीलप्रमाणे...

- **5 वर्षे मूलभूत** (Fundamental)

  1. नर्सरी @ 4 वर्षे
  2. ज्युनियर केजी @ 5 वर्षे
  3. सिनियर केजी @ 6 वर्षे
  4. इयत्ता पहिली @ 7 वर्षे
  5. इयत्ता दुसरी @ 8 वर्षे

- **3 वर्षांची प्रारंभिक शाळा** (Preparatory)

  6. इयत्ता तिसरी @ 9 वर्षे
  7. इयत्ता चौथी @ 10 वर्षे
  8. इयत्ता पाचवी @ 11 वर्षे

- **3 वर्षांची माध्यमिक शाळा** (Middle)

  9. इयत्ता सहावी @ 12 वर्षे
  10. इयत्ता सातवी @ 13 वर्षे

11. इयत्ता आठवी @ 14 वर्षे

- **4 वर्षे माध्यमिक शाळा** (Secondary)

12. इयत्ता नववी @ 15 वर्षे
13. इयत्ता दहावी @ 16 वर्षे
14. एफ.वाय.जे.सी. @ 17 वर्षे
15. एस.वाय.जे.सी. @ 18 वर्षे

वरील शिक्षणाच्या नवीन सूत्रानुसार वयोगट 3 ते 8 मधील शिक्षण हे मूलभूत शिक्षण समजले जाणार आहे. त्यासाठी बालसुलभ शिक्षण आणि अभ्यासक्रम विकसीत केला जाईल. लहान मूलाच्या मेंदूच्या एकंदर विकासापैकी 85% हून अधिक विकास वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत होत असतो. त्यासाठी मुलांना प्रामुख्याने लवचिक, बहुस्तरीय, खेळांवर आधारित, कृती आधारित आणि जिज्ञासा आधारित शिक्षण दिले जाईल. अंगणवाडीच्या शाळा पूर्वप्राथमिक वर्गाशी जोडल्या जातील. जिथे शक्य असेल तेथे पूर्वप्राथमिक शाळा प्राथमिक शाळेशी जोडण्याचा प्रयत्न असेल.

**शालेय शिक्षण देण्याची पध्दत :**

3 ते 8 या वयोगटातील मुलासाठी उपक्रमाधारीत, खेळांच्या माध्यमातून आणि लवचिकता असलेले शिक्षण दिले जाणार आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मुलांमध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यावे, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. सामान्यपणे प्रारंभिक आणि पूर्वमाध्यमिक शाळेच्या सुरवातीपासूनच अभ्यासक्रमात लिहिणे, वाचणे, बोलणे, मोजणे, अंकगणित आणि गणितीय विचार यावर अधिक लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि आवड निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम आणि नियमीत कार्यक्रम राबवले जातील. त्यासाठी दिवसातील विशिष्ट तास राखून ठेवले जाणार आहेत. आपल्याला माहिती आहेच की, लहान मुलांना आपल्या मातृभाषेतच अवघड संकल्पना अधिक लवकर समजतात. म्हणून किमान इयत्ता पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना केवळ मातृभाषेतून शिक्षण दिले पाहिजे. त्यानंतर जिथे शक्य आहे तिथे त्याला स्थानिक भाषा व राष्ट्रीय भाषा शिकवली जाईल. उर्वरित विषय तो इंग्रजी भाषेत शिकत असला तरी तो एक विषय म्हणून शिकवला जाईल. इयत्ता सहावीनंतर तीन भाषा शिक्षण पध्दती सुरू केली जाईल. ज्यात स्थानिक भाषेला प्राधान्य दिले जाईल. ज्या प्रदेशात हिंदी बोलली जात नाही तिथे हिंदी भाषा शिक्षणाला प्राधान्य दिले जाईल आणि हिंदी भाषिक प्रदेशात इतर कोणत्याही मान्यता प्राप्त भारतीय भाषेला प्राधान्य दिले जाईल. व्यावसायिक शिक्षण शालेय शिक्षणात समाविष्ट केले जाणार आहे. शाळांमध्ये असलेल्या हुशार मुलांना अपेक्षित शिक्षण मिळावे म्हणून “राष्ट्रीय शिक्षण कार्यक्रमा” अंतर्गत दर आठवड्याला पाच तासाचे अतिरिक्त शिक्षण पुरविले जाईल. तसेच जे विद्यार्थी अपेक्षित क्षमतेपेक्षा मागे आहेत, त्यांच्यासाठी उपाययोजनात्मक शिक्षणही पुरविले जाईल.

प्रत्येक विद्यार्थ्यांकडे नीट लक्ष देता यावे यासाठी विद्यार्थी शिक्षक प्रमाण 30:1 असे असेल. त्यासाठी शिक्षकाच्या रिक्त जागा

लवकरात लवकर भरल्या जातील. तसेच पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान शिकविण्यासाठी शिक्षकांना सातत्याने व्यावसायिक विकासासह प्रशिक्षण आणि सहाय्य केले जाईल. कुपोषित किंवा आजारी असताना मुले योग्य प्रकारे शिकू शकत नाहीत. म्हणूनच पौष्टिक जेवण आणि प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्ते आणि समुपदेशक यांचा शालेय व्यवस्थेमध्ये समावेश करून मुलांची पोषण आणि आरोग्यविषयक समस्या सोडवली जाईल. अपेक्षित धेय्य गाठण्यासाठी शाळांना आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविल्या जाणार आहेत. इत्यादीं बाबींचा नवीन शैक्षणिक धोरणात समावेश असेल.

**शालेय अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र :**

सर्व स्तरावरील अभ्यासक्रम व अध्यापनातील सुधारणांचा मुख्य भर असेल तो म्हणजे समज वाढवण्याचा आणि पाठांतर (घोकंपटीच्या) शिक्षणापासून शिक्षण व्यवस्थेला दूर नेण्याचा. घोकंपट्टी करून शिकण्यापेक्षा रचनात्मक पध्दतीने शिकण्यावर भर दिलेला आहे. तसेच शालेय पाठ्यपुस्तकातही विविध प्रकारचे बदल केलेले आहेत. शिक्षणाचे उद्दिष्ट केवल आकलनात्मक विकास करणे एवढेच नसून, चांगले व्यक्तिमत्व घडविणे व अष्टपैलू व्यक्ती निर्माण करणे हे देखील असेल. तसेच शिक्षण एखाद्या व्यक्तीमध्ये आधीपासूनच अस्तीत्वात असलेल्या ज्ञानाची अभिव्यक्ती होण्यास मदत करते. ही महत्त्वाची उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र सुधारित केले जातील. पूर्वप्राथमिक शाळेपासून उच्च शिक्षणापर्यंत शिकण्याच्या प्रत्येक टप्प्यावर विविध क्षेत्रातील विशिष्ट कौशल्ये आणि मूल्ये निश्चित केले जातील. अभ्यासक्रमातील मजकूर कमी करून प्रत्येक विषयातील अत्यावश्यक घटक ठेवले जातील. जेणेकरून चिकित्सक विचार, प्रश्नाधारित, संवाद आधारित आणि विश्लेषण आधारित शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जाईल. सर्व स्तरावर अनुभवात्मक शिक्षणाचा अवलंब केला जाईल. ज्यात प्रात्यक्षिक शिक्षण, कला आणि खेळ यांचा समावेश असलेले शिक्षण, कथा-कथन आधारित शिक्षण इत्यादींचा समावेश असेल. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम निवडीमध्ये लवचिकता देऊन त्यांना अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न असेल.

**बोर्ड परीक्षेचे महत्त्व कमी करून आंतरशाखीय शिक्षणाला प्राधान्य :**

नवीन धोरणानुसार बोर्ड परीक्षांचे महत्त्व कमी करण्यात आले आहे. आता बोर्ड परीक्षा फक्त 12 वी मध्ये द्यावी लागेल. तर यापूर्वी दहावीची बोर्ड परीक्षा देणे बंधनकारक होते, ती आता रद्द करण्यात आलेली आहे. 9 वी ते 12 वी वर्गाच्या सत्र परीक्षा असतील. तसेच 9 वी ते 12 वी एकत्र करून चार वर्षाचा कोर्स प्रस्तावित आहे, ज्यात कला, वाणिज्य आणि शास्त्र असा शाखानिहाय फरक रद्द केला असून, एकूण 8 सेमीस्टरचा हा कोर्स असेल. ज्यात भाषा, गणित आणि शास्त्र हे विषय बंधनकारक करून इतर कोणतेही विषय आपल्या आवडीनुसार निवडता येतील. विशेषत: माध्यमिक शाळेत यामध्ये शारीरिक शिक्षण, कला, हस्तकला आणि व्यावसायिक कौशल्यांचासुध्दा अंतर्भाव असेल. त्यामुळे विद्यार्थी त्यांच्या अभ्यासाच्या आणि जीवनाच्या योजनेचे मार्ग स्वत: ठरवू शकतील. पाठांतर करून उत्तर लिहिण्याऐवजी दैनंदिन उपयुक्त ज्ञानावर आधारित परीक्षा असेल.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

**वाचन संस्कृतीला प्रोत्साहन :**

वाचनाला आणि त्यातून ज्ञानवृध्दीला प्राधान्य मिळावे म्हणून संपूर्ण देशात सार्वजनिक ठिकाणी आणि शाळांमध्ये ग्रंथालये आणि वाचनकक्ष उभारले जातील. सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी मनोरंजक आणि प्रेरणादायक पुस्तके विकसित करून, त्याचा सर्व स्थानिक व भारतीय भाषामध्ये अनुवाद केला जाईल. ही पुस्तके शालेय आणि स्थानिक सार्वजनिक वाचणालयामध्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येतील. देशभरात वाचन संस्कृती निर्माण करण्यासाठी सार्वजनिक आणि शालेय वाचनालयांचा लक्षणीयरित्या विस्तार केला जाईल. सध्याच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात डिजीटल वाचणालयेदेखील स्थापन केले जातील.

अशा प्रकारे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय शिक्षणामध्ये योग्य ते बदल करण्यात आलेले आहेत.

➢ **उच्च शिक्षण :**

मनुष्य व समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीने तसेच राष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये उच्च शिक्षणाचे महत्त्वपूर्ण योगदान असते. 21 व्या शतकाच्या गरजा लक्षात घेता चांगला, विचारवंत, अष्टपैलू आणि कल्पक व्यक्ती विकसित करणे हे उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय स्तरापासून उच्च शिक्षण स्तरापर्यंत प्रत्येक स्तरावर विशिष्ट निर्धारित कौशल्ये आणि मूल्यांची ओळख करून देणे गरजेचे आहे. सामाजिकदृष्ट्या ज्ञानी, जागृत, विद्वान, आणि कुशल राष्ट्र निर्माण करण्याची क्षमता उच्च शिक्षणामध्ये आहे.

आज भारतातील उच्च शिक्षणप्रणाली अनेक समस्यांचा सामना करत आहे. या समस्या सोडवण्यासाठी उच्च शिक्षण व्यवस्थेचे नुतनीकरण करून तिला नवी ऊर्जा प्रदान करणे आणि सर्वसमावेशक असे उच्च गुणवत्तेचे शिक्षण प्रदान करणे, हे या नवीन शैक्षणिक धोरणात संकल्पित आहे. या नवीन धोरणांमध्ये पुढील मुख्य बदलांचा समावेश केलेला आहे.

**पदवी स्तर :**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयीन पदवी 3 ते 4 वर्षाची असेल. म्हणजेच पदवीच्या पहिल्या वर्षात प्रमाणपत्र मिळेल, दुसऱ्या वर्षी पदविका असेल, तृतीय वर्षात डिग्री मिळेल. जे संशोधनासाठी उच्च शिक्षण घेऊ इच्छितात त्यांच्यासाठी तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असेल. म्हणजेच संशोधन करणाऱ्यासाठी पदवी अधिक एक वर्षाचा मास्टर्स अभ्यासक्रम अशी चार वर्षाची पदवी असेल. दरम्यानच्या काळात ते इतरही कोर्स करू शकतात. या नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत जर एखाद्या विद्यार्थ्याला कोर्सच्या मध्यभागी दुसरा कोर्स करायचा असेल तर तो मर्यादित काळासाठी पहिल्या कोर्समधून ब्रेक घेऊन दुसरा कोर्स करू शकतो.

**बहुशाखीय (मल्टीडिसिप्लिनरी) अभ्यासक्रम :**

भारताला 21 व्या शतकात आणि चौथ्या औद्योगीक क्रांतीकडे नेण्यासाठी एक सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षण आवश्यक आहे. बहुशाखीय शिक्षणाला चालना देण्यासाठी आवश्यक असलेले भाषा वाङमय, संगीत, तत्त्वज्ञान, कला, नाट्य, नृत्य, शिक्षण, गणित, संख्याशास्त्र, उपयोजित विज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, क्रिडा, भाषांतर, दुभाषीकाम, पर्यावरण शिक्षण, मूल्याधारित शिक्षण आणि

ISSN–2277- 8721
EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022
OPEN ACCESS Original Research Article

अशा इतर अनेक विषयाचे विभाग उच्च शैक्षणिक संस्थामध्ये स्थापन केले जाणार आहेत. मल्टीडिसिप्लिनरी अभ्यासक्रमांतर्गत एकाच वेळी वेगवेगळे विषय एकत्रितपणे शिकता येणार आहेत. यात मेजर आणि मायनर असे विषयाचे विभाजन असेल. आर्थिक व अन्य कारणामुळे होणारे गळतीचे प्रमाण यामुळे कमी होईल. शिवाय ज्यांना एखादा विषय आवडीचा असेल तो विषय शिकता येईल. कुठल्याही टप्प्यावर शिक्षण थांबवता येईल. त्या शिक्षणाचे गुणांक राखून ठेवले जातील व काही काळाने पुढील शिक्षण घेता येईल. 2030 पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात किमान एकतरी बहुविध आंतरशाखीय महाविद्यालय सुरू केले जाईल, असे उद्दीष्ट केंद्रीय मंत्रालयाने ठेवले आहे. आत्तापर्यंत एकाच शाखेतील विषय घेऊन पदवी घेतली जात होती. आता बहुविध शाखांतील वेगवेगळे विषय एकाच वेळी घेऊन पदवी पूर्ण करता येणार आहे. केवळ विद्यापीठेच नव्हे तर महाविद्यालयेही बहुविधशाखा अभ्यासक्रमाची होणार असल्यामुळे त्यानुसार शुल्कनिश्चिती केली जाईल. सरकारी तसेच खासगी शैक्षणिक संस्थांच्या शुल्क आकारणीसाठी समान अटी व शर्ती निश्चित केल्या जाणार आहेत. त्या चौकटीतच शुल्क निश्चित केले जाईल.

**संशोधन पध्दत (थेट पीएचडी प्रवेश) :**

ज्या विद्यार्थ्यांना संशोधन करायचे असेल, त्यांच्यासाठी चार वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. त्यानंतर ते थेट पीएचडी साठी प्रवेश घेऊ शकतात. यापुढे एम. फिल. करण्याची गरज नाही, म्हणून नवीन शैक्षणिक धोरणामध्ये एम. फिल. रद्द करण्यात आलेले आहे. तसेच ज्यांना संशोधन करायचे नाही व जे विद्यार्थी पदवीनंतर नोकरी करू इच्छितात, त्यांच्यासाठी तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. ज्ञाननिर्मिती आणि संशोधन या गोष्टी समाजाच्या उत्थानासाठी आणि देशाच्या विकासासाठी अतिशय महत्त्वाच्या आहेत. सध्या जगात घडणाऱ्या जलद बदलांकडे पाहता संशोधनाची एक मजबूत परिसंस्था महत्त्वाची झालेली आहे. देशातील विद्यार्थ्यांना संशोधनाची संधी उपलब्ध व्हावी, संशोधनाला अर्थसहाय्य करण्यासाठी आणि विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये सक्रियपणे संशोधन रुजवण्यासाठी 'नॅशनल रिसर्च फाऊंडेशनची' स्थापना केली आहे. या फाऊंडेशन अंतर्गत पुढील पाच वर्षात 50 हजार कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. भारतातील संशोधन आणि नाविण्यपूर्णतेतील सध्याची गुंतवणूक GDP च्या फक्त 0.69 % आहे. तर अमेरिकेच्या बाबतीत हा आकडा 2.4% आहे. दक्षिण कोरीयाच्या बाबतीत 4.2% आहे. यावरून लक्षात येते की, आपल्याला अजून संशोधन क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे गरजेचे आहे.

**प्रभावी अभ्यासक्रम :**

अभ्यासक्रम हा खिळवून ठेवणारा आणि प्रसंगाला अनुरूप असावा. तसेच आधुनिक ज्ञानाच्या गरजांबरोबर त्याची सांगड घालण्यासाठी अभ्यासक्रमात नियमितपणे बदल केला पाहिजे. मूल्यांकन पध्दतीची रचना शास्त्रावर आधारित असावी. तसेच तिच्यात अध्ययनामध्ये सातत्याने सुधारणा करण्याची आणि ज्ञानाच्या वापराची चाचणी घेण्याची क्षमता असावी. अशा प्रकारे अभ्यासक्रम, अध्यापनशात्र, सातत्यपूर्ण मूल्यांकन आणि विद्यार्थ्यांना सहाय्य हे गुणवत्तापूर्ण अध्ययनाचे आधारस्तंभ आहेत. वरील सर्व उद्दिष्टे समोर ठेवूनच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अभ्यासक्रमाची रचना केलेली असेल. कल्पकतेला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रम,

अध्यापनशास्त्र आणि मूल्यांकनामध्ये नावीन्यपूर्ण शोध लावण्याकरिता संस्था आणि शिक्षाकांकडे स्वायत्तता असेल. सर्व विद्यार्थ्यांना चालना देणारा आणि गुंतवूण ठेवणारा अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्राची रचना केली जाईल. तसेच अभ्यासक्रमामध्ये इतर विविध नाविन्यपूर्ण उपक्रमाचाही समावेश असेल. उदा: ऑनलाईन शिक्षण, करीयर समुपदेशन, विद्यार्थी मदत केंद्रे, गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य इत्यादी.

व्यावसायिक (व्होकेशनल) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अल्प असण्याची अनेक कारणे दिसून आलेली आहेत. त्यामुळे व्यावसायिक शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. पुढील दशकात टप्याटप्याने सर्व शाळा आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षण एकात्मिक केले जाईल.

**बहुभाषिक शिक्षण :**

बहुभाषिक शिक्षणाचे उद्दिष्ट समोर ठेवून मुलांना शिकवताना एकाच भाषेच्या माध्यमातून अध्यापन न करता विविध प्रादेशिक भाषांचा वापर करता येणार आहे. लॉ आणि मेडिकल शिक्षण वगळता सर्व उच्च शिक्षण एका छताखाली येणार आहे.

**शिक्षणातील गुंतवणूक :**

समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपल्या युवकांना उच्च शिक्षण देण्याइतकी चांगली गुंतवणूक इतर कोणतीही नाही. त्यामुळे हे धोरण शिक्षणातील गुंतवणूक वाढवण्यासाठी बांधिल आहे. शिक्षणातील गुंतवणूक जीडीपीच्या 6% करण्यात येणार आहे, सध्या भारताचा शिक्षणावरील केंद्र व राज्य मिळून सरकारी खर्च GDP च्या सुमारे 4.43% इतका आहे.

**प्रेरीत, उत्साही आणि सक्षम शिक्षक :**

कोणत्याही उच्च शिक्षणसंस्थेचा यशाचा सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षकांची गुणवत्ता आणि त्यांचा सहभाग. उच्च शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यात शिक्षकांची निर्णायक भूमिका असते. म्हणून उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये सर्वोत्कृष्ट, प्रेरित, आणि सक्षम अध्यापक असावेत, हे लक्ष्य साध्य करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणात पुढील उपक्रमांची शिफारस केलेली आहे. उच्च शैक्षणिक संस्थामध्ये सर्व प्रकारच्या पायाभूत सोयीसुविधा सुसज्ज ठेवल्या जातील. विद्यार्थी शिक्षकाचे गुणोत्तर जास्त असणार नाही. जेणेकरून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी, संशोधन करण्यासाठी व इतर उपक्रमासाठी त्यांना पुरेसा वेळ मिळेल. शिक्षकांना पाठ्यपुस्तक व वाचन सामग्री निवडण्याचे आणि अभ्यासक्रमाची रचना करण्याचे स्वातंत्र्य असेल. शिक्षकाला स्वत:ला योग्य वाटेल अशा नाविन्यपूर्ण पध्दतीने अध्यापन, संशोधन आणि सेवा करण्याचे अधिकार असतील. योग्य पुरस्कार, पदोन्नती, सन्मान आणि संस्थेच्या नेतृत्वात सहभाग याद्वारे उत्कृष्ट शिक्षकास प्रोत्साहीत केले जाईल. दरम्यान मूलभूत निकषांनुसार कामगिरी न करणाऱ्या शिक्षकांना जबाबदार धरले जाईल. तसेच उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिक्षकांच्या भरतीसाठी स्पष्ट, स्वतंत्र आणि पारदर्शक निकष असतील.

**शिक्षक होण्यासाठीची पात्रता :**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार B. Ed. रद्द करून 4 वर्षाचा एकत्मिक B. Ed. अभ्यासक्रम ही 2030 पर्यंत शालेय शिक्षकांसाठी

शिक्षकांसाठी किमान पदवी पात्रता असेल. बारावीनंतर थेट या कोर्सला प्रवेश घेता येईल आणि हे शिक्षक प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये नियुक्तीसाठी पात्र असतील. ज्यांनी इंटिग्रेटेड B. Ed. केलेले नाही ते पदवीनंतर ज्या महाविद्यालयात इंटिग्रेटेड B. Ed. आहे, त्याच महाविद्यालयात एक वर्षाच्या B. Ed. साठी प्रवेश घेऊ शकतात.

➢ **अकॅडमिक बॅंक ऑफ क्रेडिट :**

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाच्या एक वर्ष पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर विविध नाविन्यपूर्ण योजनांची घोषणा केली. त्यातीलच एक योजना म्हणजे "अकॅडमिक बॅंक ऑफ क्रेडिट" (Academic Bank Credit) होय. प्रत्येकाला शिक्षण घेता यावे, या उद्देशाने देशात "अकॅडमिक बॅंक ऑफ क्रेडिट" ही योजना राबविली जाणार आहे. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार व उपलब्ध वेळेनुसार शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होईल. ही योजना काय आहे ते आपण थोडक्यात समजून घेऊया.

'अकॅडमिक बॅंक ऑफ क्रेडिट' म्हणजे शैक्षणिक विषयातील क्रेडिटची व्हर्च्युअल स्टोअर हाऊस आहे. जे प्रत्येक विद्यार्थ्यांचा शैक्षणिक डेटा स्टोअर करणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि विद्यापीठांना अकॅडमिक बॅंक ऑफ क्रेडिट योजनेत आपली नोंदणी करावी लागेल. त्यानंतरच संबंधित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती येथे स्टोअर होणार आहे. या योजनेनुसार विद्यार्थी नोकरी किंवा व्यवसाय करीत शिक्षण घेऊ शकणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तव आपला अभ्यासक्रम मध्येच सोडवा लागला तर त्यांना यामुळे खूप मोठा फायदा होणार आहे. कारण या योजनेमुळे त्या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाणार नाही. त्यासोबतच अॅकेडमिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रत्येक नोंदी सुरक्षित राहणार आहेत. त्याने पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमाचे क्रेडीट जमा करून ठेवता येतील. त्याला पुन्हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी मिळेल. विद्यार्थ्यांने किती प्रमाणात अभ्यासक्रम पूर्ण केला आहे त्यानुसार त्याचे मूल्यमापन करून त्याला प्रमाणपत्र, डिप्लोमा किंवा पदवी दिली जाणार आहे. महाविद्यालयीन शिक्षणाचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झाल्यावर प्रमाणपत्र, द्वितीय वर्ष उत्तीर्ण पदविका आणि तीन वर्षे किंवा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर पदवी प्रदान केली जाईल. हे व्यावसायिक बँकेसारखे कार्य असून यामध्ये विद्यार्थी ग्राहक असणार आहेत.

➢ **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मूल्यशिक्षण:**

1. भारत हा हजारो वर्षाच्या कालावधीत विकसित झालेल्या कला, साहित्य, रूढी, परंपरा, भाषिक अभिव्यक्ती, प्राचीन वस्तू, वारसा स्थळे आणि इतर अनेक स्वरूपांत व्यक्त झालेल्या संस्कृतीचा खजिना आहे. जगभरातील कोट्यावधी लोक पर्यटनासाठी भारताला भेट देतात. भारतीय हस्तकलेच्या वस्तू व वस्त्रे खरेदी करणे, अभिजात भारतीय साहित्य वाचणे, योग व ध्यान करणे, भारतीय तत्त्वज्ञानाने प्रेरित होणे, भारतातील विविध संगीत आणि कलांचा आनंद लुटणे आणि भारतीय चित्रपट पाहणे अशा इतर अनेक प्रकारे या सांस्कृतिक खजिन्याचा दररोज आस्वाद घेत असतात. म्हणून भारताच्या या

सांस्कृतिक संपत्तीचे जतन आणि प्रचार करणे ही देशाची उच्च प्राथमिकता आहे, कारण देशाची ओळख तसेच अर्थव्यवस्थेसाठी हे खऱ्या अर्थाने महत्वाचे आहे.

2. शालेय मुलांमध्ये भाषा, कला आणि संस्कृती यांना उत्तेजन देण्यासाठीच्या बऱ्याच उपायांची चर्चा या धोरणामध्ये केली आहे, ज्यात शाळेच्या सर्व स्तरांमध्ये संगीत, कला आणि हस्तकला यावर अधिक भर देणे; बहुभाषिकतेला प्रोत्साहन देण्यासाठी त्रिभाषा सूत्राची लवकर अंमलबजावणी करणे; शक्य असेल तेथे मातृभाषेत किंवा स्थानिक भाषेत शिक्षण देणे आणि भाषा-शिक्षण अधिक अनुभवात्मक बनवणे ही सर्व उद्दिष्टे नवीन शैक्षणिक धोरणात सांगितलेली आहेत.
3. मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी, समान आणि न्याय्य समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन करण्यासाठी तसेच वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे.
4. मुलांनी केवळ शिकणेच महत्त्वाचे ठरणार नाही तर कसे शिकायचे, हे शिकणे जास्त महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे मजकूर कमी करून शिक्षण तार्किक विचार कसा करायचा आणि समस्या कशा सोडवायच्या, कल्पक आणि बहुशाखीय कसे व्हायचे, नाविण्यपूर्णता कशी आणायची, जुळवून कसे घ्यायचे आणि बदलणाऱ्या क्षेत्रातील नवीन सामग्री कशा प्रकारे आत्मसात करायची, हे शिकले पाहिजे. तसेच शिक्षणामुळे चारित्र्य घडले पाहिजे. ज्यायोगे शिकणारे नीतिवान, तर्कशुध्द, सहानुभूतीशिल आणि सहृदय बनतील.
5. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापयांतच्या शिक्षणव्यवस्थेत समानता आणि एकात्मता आणणाऱ्या मोठ्या सुधारणा करणे आवश्यक आहे. शिक्षणाने केवळ आकलन क्षमता विकसित केली पाहिजे असे नाही तर सामाजिक, नैतिक आणि भावनिक क्षमतांचा विकाससुद्धा केला पाहिजे.
6. भारतीय तत्त्वज्ञानात ज्ञान, प्रज्ञा आणि सत्याचा शोध ही नेहमीच मानवाची सर्वोच्च उद्दिष्टे मानली जातात. प्राचीन भारतात शिक्षणाचे लक्ष्य या सांसारिक जीवनाची तयारी किंवा शाळेनंतरच्या जीवनाची तयारी म्हणून ज्ञान मिळवणे एवढेच नव्हते, तर पूर्ण आत्म-ज्ञान किंवा मोक्ष मिळविणे हे होते.
7. सर्व स्तरांवरील अभ्यासक्रम आणि अध्यापनातील सुधारणांचा एकंदर मुख्य भर असेल तो म्हणजे खरोखर समज वाढवण्याच्या आणि कसे शिकायचे ते शिकण्याच्या दिशेने व सध्या मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असलेल्या पाठांतर संस्कृतीच्या (घोकंपट्टीच्या) शिक्षणापासून शिक्षण व्यवस्थेला दूर नेणे यांवर असेल. शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ आकलनात्मक विकास करणे एवढेच नसून, चांगले व्यक्तिमत्त्व घडवणे आणि 21 व्या शतकातील प्रमुख कौशल्ये आत्मसात केलेल्या अशा समग्र व अष्टपैलू व्यक्ती निर्माण करणे हेदेखील असेल.

8. शिक्षण हे एखाद्या व्यक्तीमध्ये आधीपासूनच अस्तित्वात असलेल्या परिपूर्णतेच्या रूपात ज्ञानाची अभिव्यक्ती होण्यास मदत करते. ही महत्त्वाची उद्दिष्टे गाठण्यासाठी अभ्यासक्रम आणि अध्यापन शास्त्राचे सर्व पैलू सुधारित केले जातील. अभ्यासक्रमातील मजकूर कमी करून प्रत्येक विषयातील अत्यावश्यक घटक राखले जातील, जेणेकरून चिकित्सक विचार, अधिक समग्र, प्रश्नाधारित, संवाद आधारित आणि विश्लेषण आधारित शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जाईल.
9. "जे योग्य आहे ते करण्याचे" महत्त्व विद्यार्थ्यांना लहानपणीच शिकवले जाईल. आणि नैतिक निर्णय घेण्यासाठी त्यांना एक तार्किक चौकट उपलब्ध करून दिली जाईल. त्यामध्ये फसवणूक, हिंसाचार, वाङ्मयचौर्य, कचरा करणे, सहिष्णुता, समानता, सहानुभूती यासारख्या विषयांचा समावेश केला जाईल. आपले आयुष्य जगताना नैतिक मूल्यांचा स्वीकार करणे तसेच एखाद्या नैतिक मुद्द्यावर वेगवेगळ्या दृष्टीकोनातून विचार करून आपली भूमिका किंवा युक्तिवाद तयार करणे आणि सर्व कामामंध्ये नैतिक पध्दतींचा अवलबं करणे, या सर्वांसाठी मुलांना सक्षम बनवणे हा यामागचा उद्देश आहे.
10. अशा प्रकारच्या मूलभूत नैतिक युक्तिवादाचा परिणाम म्हणजे सर्व विद्यार्थ्यांमध्ये भारतीय पारंपारिक मूल्ये आणि सर्व मूलभूत मानवीय व घटनाममक मूल्ये (उदा. सेवा, अहिंसा, स्वच्छता, सत्य, निष्काम कर्म, शांती, त्याग, सहिष्णुता, बहुसत्तावाद, नैतिक आचरण, लैंगिक संवेदनशिलता, वडीलधारयांचा आदर करणे, पर्यावरणाचा आदर करणे, मदत करणे, शिष्टाचार, सहनशिलता, क्षमाशिलता, सहानुभूती, करूणा, देशभक्ती, अखडंता, जबाबदारी, न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व इत्यादी) विकसित केली जातील.

**संदर्भ :**

➢ दैनिक लोकमत (पुणे आवृत्ती), दि. 8 एप्रिल 2021
➢ तरूण भारत (जळगाव आवृत्ती), 29 नोव्हे. 2021
➢ राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार
➢ https://www.education.gov.in
➢ https://vidyarthimitra.org

**Cite This Article:**
*प्रा. डॉ. धनराज हाडुळे, (2022*) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि मूल्यशिक्षण, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,****Volume No* XI *( Special Issue-I), 100-109.*